लोकमत

# अकोटात विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे दिले धडे!

लोकमत न्यूज नेटवर्क

**अकोट :** येथील कृषी विद्यालयात सायबर सुरक्षा जागरूकता अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात विद्यार्थ्यांना इंटरनेटवरील धोके, सुरक्षितता उपाययोजना आणि सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, सायबर क्राईम याबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

हा कार्यक्रम कीक हिल फाउंडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबू आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन मुख्याध्यापक रावणकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शंकरलाल खंडेलवाल विद्यालयातील विद्यार्थी सुमित संजय सपकाळ व अनिकेत भूडके यांनी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनीही या अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. आम्हाला इंटरनेटचा योग्य आणि सुरक्षित वापर करण्याबद्दल खूप काही शिकायला मिळाले, असे विद्यार्थ्यांनी सांगितले. यावेळी शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.